H&R A
WESTERN INDIA
Estd : 1951

पुण्य नगरी

# मद्यावरील व्हॅट पुन्हा वाढवण्याविषयी फेरविचार आवश्यक

**▮ हॉटेल व्यावसायिकांचे राज्य सरकारला आवाहन ▮ पर्यटनावर होत असलेल्या नकारात्मक परिणामाबद्दल चिंता**

▮ **मुंबई** : करांमध्ये लक्षणीय वाढ झाल्यामुळे आदरातिथ्य उद्योगावर, विशेषतः रेस्टॉरंट आणि बारवर विपरीत परिणाम होत आहे. राज्याच्या पर्यटन क्षेत्रावरही परिणाम होत असून पर्यटन आणि राज्याच्या महसुलावर होणारा परिणाम, आदरातिथ्य आस्थापनांच्या व्यवसायाचे होणारे नुकसान लक्षात घेऊन मद्यावरील व्हॅट पुन्हा वाढवण्याविषयी फेरविचार आवश्यक असल्याचे आवाहन हॉटेल व्यावसायिकांनी महाराष्ट्र सरकारला केले आहे.

हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसिएशन (वेस्टर्न इंडिया) एचआरएडब्ल्यूआयच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार, पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांना राज्यभरातील बार आणि रेस्टॉरंटमध्ये दिल्या जाणाऱ्या दारूवरील व्हॅटवरील ५ टक्के वाढ मागे घेण्याविषयी निवेदन सादर करण्यात आले. मद्यावरील व्हॅटमध्ये अनपेक्षित वाढ झाल्याबद्दल चिंता



आणि आश्चर्य व्यक्त करताना, एचआरएडब्ल्यूआयच्या वतीने पत्रक जारी केले आहे. कमी किमती केवळ राज्याच्या महसुलात वाढ करत नाहीत तर देशांतर्गत प्रवाशांना महाराष्ट्र हे पर्यटनस्थळ म्हणून निवडण्यास प्रोत्साहित करतात. उच्च किमतीमुळे रेस्टॉरंट आणि एफएल ३ परवानाधारकांच्या व्यवसायात अपरिहार्यपणे घसरण होईल, हे निदर्शनास आणून दिले आहे. किमतीत लागोपाठ होणाऱ्या वाढीमुळे ग्राहक बार आणि परमिट रूमपासून दूर राहतील. शिवाय, ही वाढ अनवधानाने बुटलेगिंगसारख्या बेकायदेशीर क्रियाकलापांना प्रोत्साहन देऊ शकते, असेही पत्रकात म्हटले आहे.

▮ सरकारने २०२० मध्ये बीयर विक्रीतील घट पाहण्यासाठी एक समिती स्थापन केली होती, ही बाबदेखील एचआरएडब्ल्यूआयने निदर्शनास आणून दिली. उत्पादन शुल्कात वाढ झाल्याचा हा परिणाम होता का हे शोधण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली होती. व्हॅटमध्ये वाढ झाल्याने हजारो परवानाधारक आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या रोजीरोटीवर थेट परिणाम होतो. आम्ही सरकारला विनंती करतो की, हा निर्णय मागे घ्यावा आणि सर्वांसाठी शाश्वत वाढ आणि समृद्धी सुनिश्चित करण्यासाठी उद्योगासोबत सहकार्याने काम करावे. राज्याची महसुली उद्दिष्टे आणि आदरातिथ्य उद्योग या दोघांनाही पाठिंबा देणारा उपाय शोधण्यासाठी आम्ही सरकार आणि भागधारकांशी चर्चा करण्यास तयार आहोत, असेही शेट्टी म्हणाले.

याबाबत एचआरएडब्ल्यूआयचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी म्हणाले की, पर्यटन क्षेत्र देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देते, जे जीडीपीच्या अंदाजे ९ टक्के आहे आणि १२ टक्क्यांहून अधिक कामगारांना रोजगार मिळतो. पर्यटन क्षेत्रात ग्राहकांना परवडणाऱ्या दरात मद्याची योग्य किंमत निश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. गोवा, हरयाणा आणि चंदिगडसह अनेक राज्यांनी ही वस्तुस्थिती ओळखून विक्री वाढवण्यासाठी आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी दारूवरील शुल्क कमी केले आहे. आपल्या राज्यात व्हॅटमध्ये होणारी वाढ अगदी विरुद्ध आहे आणि त्यामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पर्यटनावर विपरीत परिणाम होईल. पर्यटकांच्या दृष्टीने खिशाला परवडणारी एखादी वस्तू महत्त्वाची असते आणि या निर्णयामुळे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी घेतलेल्या पुढाकारांना बाधा येते. आपल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेचे मोठे चित्र लक्षात घेऊन व्हॅट वाढवण्याच्या निर्णयावर फेरविचार करावा, अशी आम्ही सरकारला विनंती करत आहोत. तसेच संघटनेचे उपाध्यक्ष चेतन मेहता म्हणाले की, किमती दुसऱ्यांदा वाढल्या आहेत, याआधीची वाढ अबकारी परवाना शुल्कात १० टक्क्यांनी वाढ केल्याने झाली. वार्षिक उत्पादन शुल्क दुपटीने वाढवल्यानंतर दारूमुळे व्यवसायांवर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे दारूच्या किमती परवडणाऱ्या असल्यास खर्चाला प्रोत्साहन मिळते, महसूल वाढतो आणि पर्यटन स्थळ म्हणून आपल्या राज्याचे एकूण आकर्षण निर्माण होते. हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्री साथरोगाच्या धक्क्यातून सावरत आहे. आगामी काळात किमतीत वाढ झाल्याने व्यवसाय मालकांनी एकवटलेली सकारात्मकता कमी होईल आणि बेकायदेशीर क्रियाकलापांसारखे अनिष्ट परिणाम होऊ शकतात. आम्ही सरकारला अशा निर्णयांचे दीर्घकालीन परिणाम विचारात घेण्याचे आवाहन करत आहोत.